Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.712
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P004

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'26
Issue–II(II), Volume–XIV

# अमरावती शहरातील असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा कामगारांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन

नाव : स्वप्निल राठोड
मो. नं. : ९८९०४३२७१५
मेल आयडी : swapnilrathod496@gmail.com
व
नाव : प्रा. डॉ. ज्योति सुभाष सेलूकर
समाजशास्त्र विभाग
बॅरी. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय,
खापरखेडा, त. सावनेर, जि. नागपूर

**गोषवारा**

ही जमात सामान्यत: तीव्र गरिबीचा सामना करते आणि मुख्य प्रवाहातील समाजाच्या परिघावर जीवन जगते. असंघटित कामगार असल्याने, त्यांच्याकडे औपचारिक, लेखी करार आणि सामाजिक सुरक्षा लाभांचा अभाव असतो. अनेक जण रोजंदारीवर काम करतात, ज्यामुळे त्यांना नोकरीची असुरक्षितता आणि हंगामी बेरोजगारीचा सामना करावा लागतो. प्रस्तुत अध्ययनासाठी अमरावती शहराची निवड केली असून यातूनच नमूना निवड करण्यात आली. अमरावती शहराच्या असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीच्या ३०० व्यक्तींची नमूना म्हणून निवड करण्यात आली. संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन सांख्यिकिय विश्लेषण SPSS 24.0 या सॉफ्टवेअरचा वापर करून करण्यात आले. अध्ययनात प्राप्त परिणाम दर्शवितात की असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे वय २५ ते ३० वर्ष असून त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतला आहे व ते बांधकाम क्षेत्रात कंत्राटी स्वरूपावर ५ ते १० वर्षापासून कार्यरत आहेत. तसेच बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा कमी आहे.

**बीजशब्द:** बंजारा, असंघटित कामगार, सामाजिक स्थिती, असुरक्षितता

## १.० प्रस्तावना

असंघटित क्षेत्रातील कामगारांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा सामान्यत: निम्न असतो, ज्याचे वैशिष्ट्य म्हणजे गरिबी, नोकरीची असुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षेचा मर्यादित अभाव. त्यांना अनेकदा जास्त कामाचे तास, असुरक्षित कामाची परिस्थिती आणि किमान वेतनाद्वारे शोषणाचा सामना करावा लागतो. कामगार शक्तीच्या मोठ्या भागाला रोजगार देणारे हे क्षेत्र हंगामी काम, औपचारिक करारांचा अभाव आणि उच्च निरक्षरतेने ओळखले जाते.

पूर्वी भटक्या असलेल्या या जमातीचे लोक आता प्रामुख्याने हंगामी शेतमजूर, बांधकाम कामगार किंवा लहान विक्रेते म्हणून काम करतात आणि तांडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुर्गम, मूलभूत सुविधांपासून वंचित वस्त्यांमध्ये राहतात.

या समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे आणि आरोग्याची स्थितीही खराब आहे, ज्याचे कारण अनेकदा जागरूकता आणि आरोग्य सेवा पायाभूत सुविधांचा अभाव हे आहे. स्थानिक शेतीमध्ये संधींच्या अभावामुळे, अनेकांना शहरी भागात मजुरीसाठी स्थलांतर करण्यास भाग पडते आणि ते बांधकामसारख्या क्षेत्रांमध्ये काम करतात. महिलांना भेदभाव आणि कमी वेतनाचा सामना करावा लागतो. त्यांना सामान्यत: पेन्शन, आरोग्य विमा किंवा सशुल्क सुट्टी यांसारख्या लाभांचा अभाव असतो. या क्षेत्रातील महिलांना अनेकदा घरगुती कामे आणि उत्पन्न मिळवणे या दुहेरी जबाबदाऱ्यांचा सामना करावा लागतो. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली.

## २.० संशोधन पध्दती

प्रस्तुत अध्ययनासाठी अमरावती शहराची निवड केली असून यातूनच नमूना निवड करण्यात आली. अमरावती शहराच्या असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीच्या ३०० व्यक्तींची नमूना म्हणून निवड करण्यात आली. संशोधनकार्यात प्राथमिक तत्थ संकलनासाठी प्रमाणिकृत मुलाखत अनुसूचीचा व सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात

आला. संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन सांख्यिकिय विश्लेषण SPSS 24.0 या सॉफ्टवेअरचा वापर करून करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या पुढील विश्लेषणाकरीता काई वर्ग मूल्य या चाचणीचा चा वापर करण्यात आला. संभाव्यता पातळी ०.०५ निर्धारीत करण्यात आली. अध्ययनात प्राप्त परिणाम दर्शवितात की

## ३.० सांख्यिकीय विश्लेषण व विवेचन

### ३.१ कामगारांचे वयानुसार वर्गीकरण

**सारणी क्र. १**: असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांचे वयानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| वयोगट | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १८ ते २५ वर्ष | १९ | ६.३ |
| २५ ते ३० वर्ष | १०६ | ३५.३ |
| ३० ते ३५ वर्ष | ४९ | १६.३ |
| ३५ ते ४० वर्ष | ५७ | १९.० |
| ४० ते ४५ वर्ष | ३२ | १०.७ |
| ४५ वर्षापेक्षा जास्त | ३७ | १२.३ |
| एकूण | ३०० | १००.० |

काई—वर्गमूल्य: ९२.८; स्वातंत्र्यांश: ५; तालिका मूल्य: ११.०७; च मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक १** मध्ये संशोधनकार्यात सहभागी झालेल्या अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांचे त्यांच्या वयानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६.३ टक्के कामगार १८ ते २५ वर्ष वयोगटातील असून ३५.३ टक्के कामगार २५ ते ३० वर्ष वयोगटातील आहे. तसेच अनुक्रमे १६.३ टक्के, १९.० टक्के व १०.७ टक्के कामगारांचे वय ३० ते ३५ वर्ष, ३५ ते ४० वर्ष व ४० ते ४५ वर्ष असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे १२.३ टक्के कामगार ४५ वर्षापेक्षा जास्त वयाचे असल्याचे आढळले.

### ३.२ कामगारांची शैक्षणिक पात्रता

**सारणी क्र. २**: असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांची शैक्षणिक पात्रता दर्शविणारी सारणी

| **शैक्षणिक पात्रता** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अशिक्षित | ५५ | १८.३ |
| प्राथमिक | १३९ | ४६.३ |
| माध्यमिक | ७१ | २३.७ |
| उच्च माध्यमिक | १४ | ४.७ |
| मॅट्रिक | १२ | ४.० |
| बारावी | ९ | ३.० |
| एकूण | ३०० | १००.० |

काई–वर्गमूल्य: २५६.१६; स्वातंत्र्यांश: ५; तालिका मूल्य: ११.०७; च मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक २** मध्ये संशोधनकार्यात सहभागी झालेल्या अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांची शैक्षणिक पात्रता दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १८.३ टक्के कामगार अशिक्षित असून ४६.३ टक्के कामगारांनी प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतले आहे. तसेच २३.७ टक्के, ४.७ टक्के व ४.० टक्के कामगारांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व मॅट्रिक पर्यंत शिक्षण घेतले असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ३.० टक्के कामगारांनी बारावी पर्यंत शिक्षण घेतले असल्याचे निदर्शनास आले.

### ३.३ बंजारा कामगार कार्यरत असलेले क्षेत्र

**सारणी क्र.३:** असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्राबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| बंजारा कामगार कार्यरत असलेले क्षेत्र | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बांधकाम क्षेत्र कामगार | १४९ | ४९.७ |
| पानटपरी | २६ | ८.७ |
| खाद्यपदार्थाचा ठेला | ३४ | ११.३ |
| ळमाल | २५ | ८.३ |
| ड्रायव्हर | १४ | ४.७ |
| ऑटोरीक्षा चालक | ६ | २.० |
| चौकीदार | १० | ३.३ |
| इलेक्ट्रीशीयन | १७ | ५.७ |
| प्लंम्बर | ९ | ३.० |
| मेक्यानीक | ६ | २.० |
| अन्य | ४ | १.३ |
| **एकूण** | **३००** | **१००.०** |

**सारणी क्रमांक ३** मध्ये अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणारे बंजारा कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रांबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४९.७ टक्के कामगार बांधकाम क्षेत्रात कामगार असून ८.७ टक्के कामगार पानटपरी करतात. तसेच अनुक्रमे ११.३ टक्के, ८.३ टक्के व ४.७ टक्के कामगारांचा खाद्यपदार्थाचा ठेला, हमाल व ड्रायव्हर असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे २.० टक्के, ३.३ टक्के आणि ५.७ टक्के कामगार ऑटोरीक्षा चालक, चौकीदार आणि इलेक्ट्रीशीयनचे काम करतात. तसेच ३.० टक्के व २.० टक्के कामगार प्लंम्बर व मेक्यानीक असून १.३ टक्के कामगार अन्य क्षेत्रात कार्यरत असल्याचे आढळले.

### ३.४ बंजारा कामगारांचे कामाचे स्वरूप

सारणी क्र. ४: असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांचा कामाचा स्वरूप दर्शविणारी सारणी

| कामाचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|

https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P004

| | | |
|---|---|---|
| तात्पुरते | ६३ | २१.० |
| कंत्राटी | १७२ | ५७.३ |
| रोजंदारी | ४० | १३.३ |
| अन्य | २५ | ८.३ |
| **एकूण** | **३००** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य: १७७.०४; स्वातंत्र्यांश: ३; तालिका मूल्य: ७.८२; च मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक** ४ मध्ये अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांचा कामाचा स्वरूप दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २१.० टक्के कामगार तात्पुरत्या स्वरूपात काम करत असून ५७.३ टक्के व १३.३ टक्के कामगार कंत्राटी स्वरूपाचे व रोजंदारीचे काम करतात. तसेच ८.३ टक्के कामगार अन्य काम करत असल्याचे आढळले.

३.५ या क्षेत्रात कार्यरत असण्याची कालावधी

सारणी क्र. ५: असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगार या क्षेत्रात कार्यरत असण्याची कालावधी दर्शविणारी सारणी

| कालावधी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ५ वर्षांपेक्षा कमी | २३ | ७.७ |
| ५ ते १० वर्षे | १०८ | ३६.० |
| १० ते १५ वर्षे | ५१ | १७.० |
| १५ ते २० वर्षे | ५७ | १९.० |
| २० वर्षांपेक्षा अधिक | ६१ | २०.३ |
| एकूण | ३०० | १००.० |

काई–वर्गमूल्य: ६२.७३३; स्वातंत्र्यांश: ४; तालिका मूल्य: ९.४९; च मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक ५** मध्ये अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणारे बंजारा जमातीतील कामगार या क्षेत्रात कार्यरत असण्याची कालावधी याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७.७ टक्के कामगार ५ वर्षांपेक्षा कमी काळापासून या क्षेत्रात कार्यरत असून ३६.० टक्के कामगार ५ ते १० वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत आहे. तसेच १७.० व १९.० टक्के कामगार १० ते १५ वर्षे व १५ ते २० वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे २०.३ टक्के कामगार या क्षेत्रात २० वर्षांपेक्षा अधिक काळापासून कार्यरत असल्याचे निदर्शनास आले.

**३.६ कामगारांचे वार्षिक उत्पन्न**

सारणी क्र.६: असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी

| वार्षिक उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू. १ लाखापेक्षा कमी | २०५ | ६८.३ |
| रू. १००००० ते १५०००० लाख | ६१ | २०.३ |

| | | |
|---|---|---|
| रू. १५०००१ ते २००००० | ३४ | ११.३ |
| रू. २००००० लाखापेक्षा अधिक | ० | ०.० |
| एकूण | ३०० | १००.० |

काई—वर्गमूल्य: ३२५.३६; स्वातंत्र्यांश: ३; तालिका मूल्य: ७.८२; च मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक ६** मध्ये अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांचे वार्षिक उत्पन्न याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६८.३ टक्के कामगारांचे वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा कमी असून २०.३ टक्के कामगारांचे वार्षिक उत्पन्न रू. १००००० ते १५०००० लाख आहेत. तसेच ११.३ टक्के कामगारांचे वार्षिक उत्पन्न रू. १५०००१ ते २००००० असल्याचे आढळले.

### ३.७ कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

सारणी क्र.७: असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी

| कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू. १ लाखापेक्षा कमी | १४३ | ४७.७ |
| रू. १००००० ते २००००० लाख | ९८ | ३२.७ |
| रू. २००००१ ते ३००००० | ५९ | १९.७ |
| रू. ३००००० लाखापेक्षा अधिक | ० | ०.० |
| **एकूण** | **३००** | **१००.०** |

काई—वर्गमूल्य: १४७.१२; स्वातंत्र्यांश: ३; तालिका मूल्य: ७.८२; च मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक** ७ मध्ये अमरावती शहरात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या बंजारा जमातीतील कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४७.७ टक्के कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा कमी असून ३२.७ टक्के कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. १००००० ते २००००० लाख आहेत. तसेच १९.७ टक्के कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. २००००१ ते ३००००० असल्याचे आढळले.

## ४.० निष्कर्ष

कामगारांचे वयानुसार वर्गीकरण

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, संशोधनकार्यात सहभागी झालेल्या बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे वय २५ ते ३० वर्ष आहे.

कामगारांची शैक्षणिक पात्रता

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, संशोधनकार्यात सहभागी झालेल्या बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगारांनी प्राथमिक शिक्षण घेतला आहे.

बंजारा कामगार कार्यरत असलेले क्षेत्र

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, अमरावती शहरातील असंघटीत क्षेत्रात काम करणारे बहुतांश बंजारा कामगार बांधकाम क्षेत्रात कामगार आहे.

बंजारा कामगारांचे कामाचे स्वरूप

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, संशोधनकार्यात सहभागी झालेल्या बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगार कंत्राटी स्वरूपाचे काम करतात.

या क्षेत्रात कार्यरत असण्याची कालावधी

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, संशोधनकार्यात सहभागी झालेल्या बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगार या क्षेत्रात ५ ते १० वर्षापासून कार्यरत आहेत.

कामगारांचे वार्षिक उत्पन्न

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, संशोधनकार्यात सहभागी झालेल्या बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा कमी आहे.

कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

- प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, संशोधनकार्यात सहभागी झालेल्या बहुतांश असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा कमी आहे.

**५.० संदर्भ ग्रंथ**


- कामगार विश्व: वाटचाल संघर्षाची, सौर पब्लिकेशन.
- आगलावे, प्र. ''सामाजिक संशोधन पद्धती'' श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर—१, २००६.
- NCEUS Report on Social Security for Unorganized Workers, National Commission for Enterprises in the Unorganized Sector, Government of India, New Delhi, 2006.
- Lal, B. S. (2015). Socio-Economic and Health Issues of Banjaras in the Era of Globalization: A Study in Telangana Tribal Villages, *International Journal of Physical and Social Sciences,* 5(6), pp.195-211.
- Satpathy, I., Patnaik, M.C.B and Tripathy, N. S. (2018). A Study on Workers In Organized And Unorganized Sectors In Automobile Industry: A Review of Literature, *International Journal of Mechanical Engineering and Technology,* 9(5), pp. 481–487.
- Naik, G. S., DMello, L and Gouda, G. G. (2018). A Study on Soci-Economic Situations of Banjara Tribes in Uttarakannada District, *Quality in Higher Education Challenges & Opportunities*, pp.258-262.
- Bhuyan, S. (2019). Socio Economic Status of Organized and Unorganized Sector Workers in Guwahati, *Pramana Research Journal,* 9(3), pp. 96-104.
- Dyavamma and Kawale, L. (2019). Tribal Working Women in Organized Sector: A Sociological Study in Raichur District, *International Journal of Multidisciplinary*,4(2), pp.781-783.
- Ali, M., Roy, S and Halder, K. (2025). Research Trends of Unorganized Sector Workers in India, *International Journal for Multidisciplinary Research*, 7(1), pp. 1-13.